# तुम्हा मुंबईच्या पोरीच बरं आहे !

—समीरा खान

‘हिंदुस्तान टाइम्स’च्या १० जुलै २०११रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकातून लेखकाच्या परवानगीने पुनर्मुद्रीत केला.

महिलांसाठी मुंबई हे एक सुरक्षित शहर आहे. असं वारंवार आपल्याला सांगितलं जातं तरीपण ह्याच शहरात एका गरोदर स्त्रीवर बलात्कार करून तिचा जीव घेतला जातो आणि तिच्या शरीराचे अवशेष बॅगेत धालून एका उपनगरीय रेल्वे स्थानकावर फेकून दिले जातात. आणखी एका तरूणीवर मालाड पूर्व मधे सामूहिक बलात्कार होतो आणि त्याचे ‘एम एम एस’ चित्रिकरण तिच्या आजूबाजूच्या लोकांमधे फिरवले जाते. एका २५ वर्षीय मुलीचा नेरूळ लोकल मधे दिवसाढवळ्या विनयभंग होतो. आणि दर दिवशी एखाद्या १८ वर्षीय विद्यार्थीनिला तिच्या कॉलेजच्या वाटेवर छेडछाडीला सामोरे जावे लागते.

तसं पाहता दिल्लीच्या तुलनेत मुंबई हे महिलांसाठी सुरक्षित शहर असल्याचं दिसतं. जसे दिल्लीतील कोणतीही मुलगी तुम्हाला सांगु शकेल, तुम्हा मुंबईच्या पोरीचं फारच बरं आहे. तरीपण रोज ह्या महानगरात स्त्रियांना चालता बोलता, उठता बसता, शिकायला किंवा कामावर जातांना, येता जाता छेडछाड, विनयभंग बलात्कार ह्या गोष्टींना सामोरे जावे लागतेच. कधीतरी अनोळखी माणसं ह्याला कारणीभूत असतात पण बहुतेक वेळेला कुणी परिचित, शेजारी, मित्रपरिवारातले किंवा आप्तेष्ट अशी माणसंच या छेडछाडीला जबाबदार असतात. सध्या मुंबई मधे महिलांवर होणाऱ्या गुन्ह्यांत वाढ झाली आहे का किंवा अधिक स्त्रिया धीटपणे पुढे येऊन हे गुन्हे नोंदवताहेत किंवा प्रसारमाध्यमे निश्चयाने अशा बातम्या उचलून धरतात का (विशेष करून मध्यमवर्गीय महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात) या मुद्दयांवर वाद होऊ शकतो. पण मुंबईच्या महिला रोजच रस्त्यावरच्या छेडछाडी आणि लैगिंक अत्याचारांना तोंड देतात. महत्वाचा मुद्दा हाच आहे. आणि आपण असा कितीही समज करून घेतला की ही विकृती दिल्ली. उत्तरप्रदेश मधे घडणाऱ्या घटनांइतकी हिंसक किंवा हिणकस नाही तरीपण ही वस्तुस्थिती त्या स्त्री पिडीतांवर अतिशय हे क्लेशकारक आणि दहशतीची असते.

तरूण स्त्रियांवर संशोधन केलेली अथवा त्यांच्याबरोबर काम केलेली कोणतीही व्यक्ती दैनंदिन छेडछाडीच्या भीतीदायक कथा ऐकवेल. काही इतक्या घाबरवणाऱ्या कशा आहेत की महिलांना आपले रोजचे व्यवहार बंद करावे लागले किंवा त्यात बदल करून निभवावे लागले आहे. मग ते शिकवण्या बुडवणे असे, येण्याजाण्याचे मार्ग बदलणे, एखादा परिसर / शेजार टाळणे किंवा ज्येष्ठांना सांगणे असो. आपल्यावर येणाऱ्या आपत्तिच्या भितीने साधे घराबाहेर पडल्यावर एखाद्या महिलेला जेव्हा टोकाचे उपाय करावे लागतात, तेव्हा ह्या विषयाच्या गांभीर्याची जाणीव आपल्याला व्हायलाच हवी. सर्वात प्रथम, हे प्रकार मुंबईत होत नाहीत हा भ्रमाचा भोपळा फोडून टाकला पाहिजे आणि मुंबईला या समस्येने ग्रासले असून त्यावर उपाय शोधण्याची गरज लक्षात घेतली पाहिजे.

रस्त्यावर होणाऱ्या ह्या लैंगिक अत्याचाराच्या घटना गांभिर्याने घेतल्याच पाहिजे. ह्या घटनांचा परामर्श घेणाऱ्या व इंटरनेटवर ह्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या Hollback ! Mumbai संस्थेच्या मताप्रमाणे "ह्या छोट्या घटना पुढे लैंगिक शोषणास उपयुक्त वातावरण तयार करतात."

ह्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने राज्य सरकार IPC ३५४ व IPC ५०९ या कलमांमधे सुधारणा करण्याचा विचार करत आहे ही खचितच, सामाधानाची गोष्ट आहे. 'स्त्रियांचा विनयभंग' ह्या आदमकालीन शब्दाने वर्णन करण्यात गुन्ह्यांची शिक्षा एक वर्षाने वाढवण्याचा विचार करत आहे. त्यादृष्टीने उच्चन्यायालय विनयभंगाची शिक्षा अजामीनपात्र करण्याची शिफारस करित आहे. ह्या गोष्टींमुळे जनमानसाला सार्वजनिक जीवनात होणाऱ्या स्त्रियांवरील दुराचारांचे गांभीर्य कळेल.

पोलीस यंत्रणा सुधारल्याशिवाय कायद्यातील सुधारणा अपुऱ्या ठरतात. रोजच्या छेडाछेडीसह महिलांवर होणाऱ्या सर्वच गुन्ह्यांकडे कायदेकारांनी कणखरतेनेले बघितलेच पहिजे. कुठल्याशा हॉटेलमधे नाच करणाऱ्या तरूणांना ताब्यात घेण्यासाठी आपली शक्ती खर्चणाऱ्या पोलिसांनी आपल्या यंत्रणेचे लक्ष महिलांवर होणाऱ्या गुन्हांवर केंद्रित केले पाहिजे. सामान्यतः बलात्कारा शिवाय इतर लैंगिक अत्याचारासंदर्भात पोलिसांमधे बेफिकीरीची वृत्ती दिसते. म्हणूनच जेव्हा नेरूळ लोकल मधे घडलेल्या दृत्कृत्याबद्दल गुन्हा नोंदवायला ती महिला पुढे आली तेव्हा ठाणे रेल्वे पोलिसांनी तिचा 'फक्त विनयभंग झाला' आहे असे सांगून तिला वाटेला लावले. पोलिसांसहित सर्व कायदा यंत्रणेला अशा लिंगभावावर आधारित गुन्ह्यांबद्दल संवेदनशील राहणे गरजेचे आहे. बलात्कारित, विनयभंग किंवा छेडछाडग्रस्त स्त्रियांशी योग्य वर्तवणूकीबरोबरच ह्या गुन्ह्यांचा तातडीने कसून छडा लावण्याबद्दल या यंत्रणांनी जागरूक राहिल पाहिजे.

लैंगिक अत्याचार क्लेशदायी असतात या बद्दल शंकाच नाही परंतु अशा अत्याचार पिडीत स्त्री आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना पुढे परिस्थितीला तोंड द्यावे लागते ते आणखिन भयंकर असते. उलटतपासणी मधे केल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या भडिमारामधे अत्याचारग्रस्त स्त्रीपासूनच गुन्ह्याची सुरूवात झाली असं चित्र उभं करण्यात येतं. त्याशिवाय ह्या गुन्ह्याच्या नोंदप्रक्रियेतील दिरंगाई किंवा तपासातले शिथीली करण ही नित्याचीच बाब झाली आहे.

रस्त्यावरची छेडछाड किंवा लैंगिक हल्ले यांच्याकडे एक गंभीर विषय म्हणून बघितले पाहिजे. सार्वजनिक जीवनातल्या स्त्रियांच्या दैनंदिन व्यवहारावर त्याचा मोठा परिणाम होतो हे लक्षात घेतलं पाहिजे. ह्याचा परिणाम सर्वव्यापी आहे व सर्वांनी ह्याच्या विरोधाची जबाबदारी घेतली पाहिजे.